महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ९० वे | दिनांक : २४/०३/२०२६ | वार : मंगळवार

## नागपुरात RSS विरोधात वंचित - काँग्रेसचा जनआक्रोश मोर्चा




**नागपूर** : उपराजधानी नागपूरमध्ये आज राजकीय वातावरण चांगलेच तापले. वंचित बहुजन आघाडी आणि काँग्रेस यांनी संयुक्तपणे काढलेल्या विशाल 'जनआक्रोश मोर्चा'ने आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (RSS) मुख्यालयावर धडक दिली. जागतिक स्तरावर गाजत असलेल्या 'एपस्टीन फाईल्स'मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींचे नाव आल्याचा खळबळजनक दावा करत, आंदोलकांनी केंद्र सरकार आणि संघाच्या विचारसरणीविरुद्ध जोरदार घोषणाबाजी केली. "देशाला एपस्टीन फाईलवाला पंतप्रधान नको," अशा घोषणांनी रेशीमबाग परिसर दणाणून गेला होता.

वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली निघालेला हा मोर्चा सकाळी नागपूरच्या मुख्य भागातून सुरू झाला. कार्यकर्त्यांच्या हातात केंद्र सरकार आणि संघाचा निषेध करणारे बॅनर्स होते. मोर्चा संघ मुख्यालयाच्या दिशेने सरकत असताना पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त तैनात केला होता. "देशाला 'एपस्टीन फाईल'वाला पंतप्रधान नको," अशा आक्रमक घोषणा आंदोलकांकडून देण्यात आल्या.

मोर्चाला संबोधित करताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, आज अमेरिका सार्वजनिक क्षेत्राच्या खाजगीकरणाची मागणी करत आहे आणि नरेंद्र मोदींनी या दिशेने पाऊल उचलण्यास सुरुवात केली आहे. अमेरिकेने परदेशात निर्यात होणाऱ्या भारतीय उत्पादनांवर 18% आयात शुल्क लादले आहे. याचा अर्थ भारतीय उत्पादने अधिक महाग होतील आणि जिथे वस्तू स्वस्त दरात उपलब्ध असतील, तिथून देश त्या खरेदी करतील. परकीय चलन मिळवण्याची संधी कमी केली जात आहे. देशाला गुलाम बनवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

एपस्टाईन फाईलचे फक्त एकच पान उघडण्यात आले आहे. त्यातून हे उघड झाले आहे की, नरेंद्र मोदींनी इतर देशांच्या प्रमुखांसमोर मुजरा केला आहे. मुद्रा मोदी आता मुजरा मोदी बनले आहेत. एपस्टाईन फाईलमध्ये याहूनही बरेच काही आहे. जगभरातील देशांकडे मोदींची सर्व माहिती आहे. हे देश मोदींना धमक्या देत आहेत की, त्यांनी करारावर सही केलीच पाहिजे, नाहीतर त्यांची गुपिते उघड केली जातील. याच कारणामुळे मोदी निमुटपणे करारावर सही करत आहेत, असा दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला.

मला आरएसएस आणि मोहन भागवत यांना विचारायचे आहे, राष्ट्राचे हित विकणे ही नरेंद्र मोदींची देशभक्ती आहे का? देशाला आर्थिक, सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या पूर्णपणे गुलाम बनवणे ही तुमची देशभक्ती आहे का? असा सवाल प्रकाश आंबेडकर यांनी केला.

या मोर्चामध्ये बोलताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देखील पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जोरदार हल्ला चढवला. मोदीसारख्या पंतप्रधानाला खाली खेचल पाहिजे, असा विचित्र - विकृत असणाऱ्या माणसाला देशाचा पंतप्रधान म्हणायची आम्हाला लाज वाटते, असे ते म्हणालेत.

## मुंबईत मिळकतीचे फेरफार आता ऑनलाईन : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे



**मुंबई** : शहर जिल्ह्यातील मिळकतीच्या फेरफार प्रक्रियेला आता डिजिटल गती मिळाली असून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुंबईतील सुमारे ३० लाख नागरिकांना याचा लाभ होणार आहे, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत विधानसभेत निवेदन करताना सांगितले. मुंबईत प्रथमच मिळकतीचे फेरफार ऑनलाईन पद्धतीने सुरू करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, मुंबई शहर व उर्वरित महाराष्ट्रातील प्रॉपर्टी कार्ड संगणकीकरणाच्या प्रणाली वेगवेगळ्या असल्यामुळे आतापर्यंत मुंबईत ऑनलाईन फेरफार प्रक्रियेत अनेक तांत्रिक अडचणी येत होत्या. मात्र नागरिकांची वाढती मागणी लक्षात घेऊन शासनाने या प्रक्रियेला गती दिली आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील १९ महसूल विभाग व ४ नगर रचना योजनांमधील सुमारे २७,८४७ मिळकती पत्रिका https://mahabhumi.gov.in/ या संकेतस्थळावर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यासाठी विशेष ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आली असून पोर्टलद्वारे नागरिकांना घरबसल्या फेरफारसाठी अर्ज करता येणार आहेत. अर्जाची स्थितीही ऑनलाईन तपासता येणार असल्यामुळे नागरिकांना शासकीय कार्यालयात जाण्याची गरज भासणार नाही.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, मुंबई शहर जिल्ह्यात प्रथमच तब्बल ४५ प्रकारच्या फेरफारांसाठी ऑनलाईन अर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामध्ये खरेदीखत, वारसा, बक्षीसपत्र, भाडेपट्टा, गहाणखत, रोड सेटबॅक, आरक्षण आणि भूसंपादन अशा विविध प्रकारांचा समावेश आहे. मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयासाठी विकसित करण्यात आलेल्या या उपक्रमाचा लाभ मुंबईतील सुमारे ३० लाख नागरिकांना होणार असल्याचे सांगून मुंबई शहरच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल यांचे हा उपक्रम राबविल्याबद्दल मंत्री बावनकुळे यांनी अभिनंदन केले.

## कमी दृश्यमानता असताना लँडिंगचा हट्ट का? : अजितदादांच्या अपघाताबद्दल विधानसभेत बोलताना चेतन तुपे रडले

**मुंबई** : २८ जानेवारी २०२६ हा महाराष्ट्राच्या इतिहासातील काळाकुट्ट दिवस होता, ज्या दिवशी राज्याचा दैदिप्यमान तारा निखळला. पण आज दोन महिने उलटूनही आपल्या लाडक्या नेत्याच्या मृत्यूचे सत्य समोर का येत नाही?" असा आर्त सवाल करत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार चेतन तुपे यांना आज विधानसभेच्या सभागृहात रडू कोसळले. २९३ च्या प्रस्तावावरील चर्चेदरम्यान तुपे यांनी अजित पवारांच्या विमान अपघातावरून सरकार आणि संबंधित 'व्हीएसआर' कंपनीला अक्षरशः धारेवर धरले. "जोपर्यंत दादांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत आम्ही शांत बसणार नाही," असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

चेतन तुपे म्हणाले, २८ जानेवारी २०२६ हा महाराष्ट्राच्या इतिहासातील अतिशय काळाकुट्ट दिवस. ही तारीख महाराष्ट्रातील १४ कोटी जनता विसरू शकणार नाही. त्या दिवशी महाराष्ट्राच्या राजकारणातील दैदिप्यमान तारा क्षितीजावरून निखळला. आपल्यातून आपले सर्वांचे आणि महाराष्ट्राचे लाडके अजितदादा आपल्याला सोडून निघून गेले. हे दु:ख राज्यातील १४ कोटी जनतेला आहे.

चेतन तुपे म्हणाले, आमच्या राष्ट्रवादीच्या सगळ्या आमदारांच्या आणि महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेच्या मनात काही प्रश्न आहेत. आम्ही सर्वांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले, चौकशीची मागणी केली. सरकार याबद्दल अतिशय समक्षपणे आणि समर्थपणे सगळी चौकशी करतील, अशी आमच्या मनात पूर्ण खात्री आहे. पण महाराष्ट्रातील १४ जनतेच्या मनात जे प्रश्न आहेत, त्याला वाचा फुटली पाहिजे.

चेतन तुपे म्हणाले, हा अपघात का घडला? याबाबत वारंवार आणि अनेक अहवालात सांगितले की, दृष्यमानता कमी होती. मग अत्यंत कमी दृष्यमानता असताना विमान लँडिंग करण्याचा प्रयत्न का केला गेला? महाराष्ट्राचा उपमुख्यमंत्री विमानात बसलेला असताना ते विमान वळवून दुसऱ्या विमानतळाकडे का नेण्यात आले नाही? थोडावेळ थांबवण्यात का आले नाही? हे प्रश्न आमच्यासारख्याला पडलेत. विमान लँडिंग करण्यासाठी व्हीएसआर कंपनीकडून पायलटवर कुणाचा दबाव होता का? असुरक्षित परिस्थिती असताना विमान लँडिंग करण्याचा प्रयत्न का केला गेला? हा खरा प्रश्न आहे. याचीही चौकशी झाली पाहिजे. याची उत्तरे मिळाली पाहिजे. याची उत्तरे जोपर्यंत मिळत नाही, तोपर्यंत महाराष्ट्राच्या मनाला शांती लाभणार नाही.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २४ मार्च २०२६


## तात्याराव पवार यांच्या "वणवा" कथासंग्रहास राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर



**छत्रपती संभाजीनगर :** येथील जेष्ठ ग्रामीण साहित्यिक श्री तात्याराव पुंजाबा पवार.यांच्या "वणवा" या ग्रामीण कथा संग्रहास प्रज्ञा बहुउद्देशिय साहित्य मंच, महाराष्ट्र, यांचा राज्य स्तरीय पुरस्कार नुकताच जाहीर झाला असुन, या संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती लिनाताई देगलूर कर यांनी तसे पत्र श्री तात्याराव पवार यांना पाठवले आहे. लवकरच बाबुराव धनवटे सभागृह शंकर नगर नागपूर, येथे पाच एप्रिल २०२६ रोजी होणा-या राज्य स्तरीय साहित्य संमेलनात त्यांना हा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.श्री तात्याराव पवार यांचा ग्रामीण शैलीतील हा तिसरा कथा संग्रह असुन या पुर्वीच्या त्यांच्या "कडू शेवगा", आणि "मातीतली माणसं" या कथा संग्रहालाही अनेक पुरस्कार मिळाले आहेत. तसेच श्री तात्याराव पवार यांच्या अनेक कथा या यु ट्युब चॅनलवर प्रा. दशरथ पाटील सर तसेच प्रा. पंढरीनाथ रेगे सर यांच्या आवाजात लोकप्रिय आहेत. त्यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांच्या मित्र परिवारात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

## कविता

मनातील मूक भावनांची
कैफीयत मांडते कविता
तरल भावनांचे शृंगार
शब्दांनी सजवते कविता

हृदयातील तीव्र संवेदनेने
व्यवस्थेशी भांडते कविता
माणसांच्या जगण्याचे
सोहळा करते ती कविता

दु:खात वेदनेवर हळुच
फुंकर मारते ती कविता
आई बापाच्या कष्टाची
आठवण देते ती कविता

शब्दांची ठिणगी पाडून
क्रांती करते ती कविता
अन्याय अत्याचारावर
तुटून पडते ती कविता

अंधारलेल्या जगामध्ये
उजेड दावते ती कविता
सुख-दु:ख सर्वांचे सदा
उजागर करते ती कविता

आरशासारखे वास्तव
दाखवीत असते कविता
स्वार्थ, मोह, मत्सराला
थारा देत नसते कविता

साऱ्या विश्वाचे जगणे
शब्दातून मांडते कविता
प्रेम दु:ख आनंद भावना
शब्दातून प्रसवते कविता

सुख दु:खात साथ देणारी
शब्दसखी असते कविता
कवी हृदयातील वेदनेची
शस्त्रक्रिया करते ती कविता



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## मुंबई ठाणे प्रमाणे शहर वासियांना सुद्धा कायमस्वरूपी मालमत्ता कर माफी द्या-डॉ राजेंद्र दाते पाटील





**मुंबई (प्रतिनिधी) :** मुंबई ठाणे मनपाच्या धर्तीवर औरंगाबाद मनपा क्षेत्रात ८०० ते १००० चौरस फुटांपर्यंत क्षेत्रफळ असलेल्या घरांना कायमस्वरूपी मालमत्ता करमाफी द्यावी अशी मागणी पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव आणि शहर विकासाचे जेष्ठअभ्यासक डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी राज्य शासना कडे केली असता या विषयाची एवढ्या व्यस्ततेत मुख्यमंत्र्यांनी गांभीर्याने दखल योग्य त्या निर्देशां सह हा प्रस्ताव अतिरिक्त मुख्य सचिव डॉ गोविंदराज यांचे कडे पाठवला असल्याचा मेल डॉ राजेंद्र दाते पाटील यांना प्राप्त झाला असल्यामुळे नेहमी प्रमाणे मुख्यमंत्र्यांनी त्यांचे निवेदनाची दखल घेऊन वेगळेच संकेत दिल्याचे स्पष्ट होत आहे. पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव आणि शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक आणि डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी पूर्वी केलेल्या मागणीची तत्कालीन मुख्यमंत्री यांनी तात्काळ दाखल घेत सदरची मागणी पुढील कारवाई साठी नगररचना विभाग महाराष्ट्र शासन यांना पाठवला होता.नेमक्या डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी सूचित केल्या प्रमाणे जनहितार्थ हा ठराव चर्चेत आला आणि त्याच धर्तीवर मुंबई मनपा मध्ये याच धर्तीवरनुकतेच ठाणे महापालीके च्या वतीने ५०० चौरस फुटांपर्यंत क्षेत्रफळ असलेल्या घरांना मालमत्ता करमाफी देण्याचा ठराव सर्वसाधारण सभेत मांडण्यात आला होता. सत्ताधारी सह ठाण्यातील सर्वपक्षीय नगरसेवकांनी सर्वानुमते या ठरावाला मंजुरी दिली.हीच मागणी आणि अपेक्षा त्यांनी औरंगाबाद मनपा प्रशासन आणि पदाधिकारी व सर्व पक्षीय नगरसेवका कडे केली आहे. मनपा प्रशासना कडून मुंबईत हा प्रस्ताव राज्य शासना कडे पाठवून त्यांस मंजुरी घेऊन त्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे.करमाफी मुळे महापालिके च्या उत्पन्नावर परिणाम होण्याची शक्यता असली तरी आता छत्रपती संभाजीनगर शहराची निवड" स्मार्ट सिटी प्रकल्पात "झालेली असल्यामुळे उत्पन्नात मोठ्या प्रमाणावर वाढ होणार आहे.याच धर्तीवर छत्रपती संभाजीनगर महानगर पालीका क्षेत्रात सुद्धा वरील नमुद प्रमाणे जनहितार्थ कायम स्वरूपी निर्णय घेणेसाठी प्रशासक/आयुक्त मनपा छत्रपती संभाजी नगर यांना निर्देशीत करावे आणि तसा सकारात्मक ठराव शासनाकडे पाठवण्याचे निर्देश व्हावेत ही विनंती करण्यात आली आहे. शहर वासीयांना दिलासा देण्या साठी विषयांकित ठराव आयुक्त -प्रशासक,मनपा छत्रपती संभाजीनगर यांनी करावा म्हणुन तसे निर्देश होणे गरजेचे आहे.राज्य सरकारने वरील विषयांकित निर्णय करणे साठी तात्काळ निर्णय घेतला जाण्याची प्रचंड मोठी गरज आहे.म्हणुन मुंबई-ठाणे मनपाच्या धर्तीवर औरंगाबाद मनपा क्षेत्रात ८०० ते १००० चौरस फुटांपर्यंत क्षेत्रफळ असलेल्या घरांना व मालमत्ताना करमाफी कायम स्वरूपी देण्याचे निर्देश नगर विकास विभागास होणे आणि त्या अनुषंगाने आयुक्त प्रशासक मनपा छत्रपती संभाजी नगर यांनी उपरोक्त प्रमाणे मंजुरी घेणे बाबतचा ठराव राज्य शासना कडे पाठविण्याचे तात्काळ जनहितार्थ आदेश व्हावेत ही जनहितार्थ विनंती राज्य शासनास या पूर्वीच करण्यात आलेली असुन आता लोक नियुक्त सदस्य नगरसेवक म्हणुन निवडून आलेले असल्या मुळे सर्व पक्षीय नगरसेवकांनी एक मुखी ठराव करून वरील प्रमाणे ठराव शासनास पाठवावा अशी विनंती व मागणी पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव आणि शहर विकासाचे जेष्ठअभ्यासक जनआंदोलन विकास कृती समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी केली असुन या अनुषंगाचे पत्र देखील त्यांनी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिले आहे.

## पीडित महिलांचे फोटो, व्हिडिओ शेअर करणाऱ्यांवर थेट गुन्हा, सायबर पोलिसांचा मोठा निर्णय



**नाशिक :** मधील गाजत असलेल्या अशोक खरात प्रकरणात आता पोलिस प्रशासनाने सोशल मीडियावरील 'डिजिटल' गुन्हेगारीविरुद्ध मोठे पाऊल उचलले आहे. या प्रकरणातील पीडित महिलांचे फोटो, व्हिडिओ आणि आक्षेपार्ह मजकूर व्हायरल करणाऱ्यांविरोधात नाशिक सायबर पोलिसांनी कडक पवित्रा घेतला आहे. पीडितांची बदनामी करणाऱ्या आणि त्यांची ओळख उघड करणाऱ्या समाजकंटकांवर थेट गुन्हे दाखल करणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

भोंदू अशोक खरातच्या कारनाम्यांमुळे अवघ्या महाराष्ट्रात खळबळ माजली आहे. पोलिसांनी खरातला अटक केली आहे. तसेच त्याच्या ट्रस्टवरील सदस्या रुपाली चाकणकर यांनाही राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. तपासादरम्यान असे निदर्शनास आले आहे की, काही विकृत मानसिकतेचे लोक कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि मॉर्फिंग तंत्रज्ञानाचा वापर करून महिलांचे बनावट तसेच आक्षेपार्ह फोटो तयार करत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, या प्रकरणाशी कोणताही संबंध नसलेल्या निरपराध महिलांचे फोटोही चुकीच्या पद्धतीने वापरले जात असून, त्यांची सामाजिक प्रतिष्ठा धुळीस मिळवण्याचा प्रयत्न होत आहे. सायबर पोलिसांनी अशा सर्व संशयास्पद पोस्टसवर बारकाईने लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे.

कायद्यानुसार कोणत्याही लैंगिक अत्याचारातील पीडित महिलेची किंवा तक्रारदाराची ओळख सार्वजनिक करणे हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. तरीही व्हॉट्सअॅप, फेसबुक आणि इंस्टाग्राम यांसारख्या प्लॅटफॉर्मवर अफवा आणि दिशाभूल करणारी माहिती वेगाने पसरवली जात आहे. "पीडितांच्या सन्मानाचे रक्षण करणे ही आमची प्राथमिकता आहे. सोशल मीडियावर चुकीची माहिती शेअर करणाऱ्यांची गय केली जाणार नाही," असा स्पष्ट इशारा पोलिस यंत्रणेने दिला आहे.

प्रकरणाची संवेदनशीलता लक्षात घेता, सायबर पोलिसांनी विशेष पथकाद्वारे सोशल मीडिया मॉनिटरिंगला प्राधान्य दिले आहे. केवळ पोस्ट तयार करणारेच नव्हे, तर त्या पोस्ट फॉरवर्ड करणारे आणि अशा ग्रुप्सचे अॅडमिनही पोलिसांच्या रडारवर आहेत. तपासात अडथळा निर्माण होईल किंवा प्रकरणाला वेगळे वळण लागेल, अशा कोणत्याही कृत्यावर पोलिस कठोर कायदेशीर कारवाई करण्याच्या तयारीत आहेत.

कोणतीही खात्री नसलेली माहिती किंवा फोटो फॉरवर्ड करण्यापूर्वी विचार करा. पीडित महिलांची ओळख पटेल असा कोणताही मजकूर शेअर करणे टाळा. सोशल मीडियावरील दिशाभूल करणाऱ्या पोस्टसवर विश्वास ठेवण्याऐवजी अधिकृत माहितीचा आधार घ्या. सोशल मीडियावर आपली बदनामी होत असल्यास तात्काळ सायबर पोलिसांकडे तक्रार नोंदवा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २४ मार्च २०२६


## श्रीराम जन्मोत्सव समिती अध्यक्षपदी ईश्वर पाटील, उपाध्यक्षपदी विनोद गजलेश्वर



**कन्नड (अरुण थोरात) :** स्वराज रक्षक युवा संघाची बैठक झाली त्या बैठकी मध्ये संघटनेच्या सर्व पदाधिकार्यांनी व स्वराज रक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष नितिन राठोड यांच्या उपस्थितीत ईश्वर पाटील यांची श्रीराम जन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी तर विनोद गजलेश्वर यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली व तसेच दोघांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. दि.२६ मार्च रोजी श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता भारुका नगर, गिरणी ग्राउंड येथे श्रीराम प्रतिमा पुजन होणार असून संध्याकाळी ०५:३० वाजता तेथून भव्य शोभा यात्रा निघणार आहे. या शोभायात्रेत तालुकयातील व शहरातील सर्व श्रीराम भक्तांनी सामील व्हावे असे आवाहन स्वराज्य रक्षक संघाचे अध्यक्ष नितीन राठोड, उत्सव समीतिचे अध्यक्ष ईश्वर पाटील, उपाध्यक्ष विनोद गजलेश्वर यांच्या सह संजय पंडीत, अनिल सिरसाठ, अनिल खंबाट, कैलाश जाधव, रमेश शिंदे, श्रीकृष्ण बडग, प्रमोद ढोले, दिपक डोळस, उमेश राठोड, जयेश देशमुख, निशांत चव्हाण, वैभव देशमुख, ओम गोरे, शुभम यांनी केले आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## गरजवंतांसाठी मोफत चष्मा वितरण; दृष्टी सेवा अभियान २९ मार्चला

**दौलताबाद (जावेद अहमद) :** दृष्टी सेवा अभियान अभियाना अंतर्गत' मोफत चष्मा वितरणाचा कार्यक्रम आयोजित केला दोन हजार गरजवंताना चष्मा वाटप करण्यात येणार आहे या अभियानाचा उद्देश नागरिकांची दृष्टी सुधारून त्यांचे आरोग्य आणि जीवनमान उंचावणे हा आहे.दि २९ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत रुक्मिणी सभागृह, एम.जी.एम. रुग्णालय प्रांगण छ. संभाजीनगर येथे सार्वजनिक आरोग्य उपक्रमांतर्गत 'दृष्टी सेवा अभियान' आयोजित करण्यात आले असून 'दृष्टी सेवा अभियानाअंतर्गत' मोफत चष्मा वितरणाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. या उपक्रमामध्ये नागरिकांची मोफत नेत्र तपासणी करून चष्ट्याचे वितरण करण्यात येणार आहे. ज्या नागरिकांना वाचनाचा चष्मा, बायफोकल चष्मा, तसेच अंतराचा चष्मा आहे किंवा डोळ्यांच्या डॉक्टरांनी नंबरचा चष्मा वापरण्यास सांगितले आहे अश्या नागरिकांनी डोळ्यांच्या डॉक्टरांनी दिलेल्या नंबरचे कार्ड या उपक्रमात नाव नोंदणी करतेवेळी नोंदणी करण्यासाठी दिलेल्या नंबर वर आपले नाव, मोबाइल नंबर, आपले वय, आणि डोळ्यांच्या डॉक्टरांच्या कार्ड चा फोटो सदर व्हाट्सअँप क्रमांकावर पाठवायचा आहे. या टीम चे सदस्य हे घाटी व एम. जी. एम. रुग्णालयाच्या ओपीडी मध्ये दररोज सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत नोंदणी साठी उपलब्ध आहेत. त्या ठिकाणी रुग्ण स्वतः जाऊन नोंदणी करून आपले नाव, मोबाईल नंबर, वय व डोळ्यांच्या डॉक्टरांनी दिलेल्या डोळ्यांच्या कार्ड चे फोटो किंवा चष्याचा नंबर तिथे उपलब्ध आहे या कार्यक्रमात एकूण २००० मोफत चष्ट्यांचे वाटप करण्यात येणार आहे. ज्या रुग्णांकडे चष्याच्या नंबरचे कार्ड उपलब्ध नसतील किंवा हरवले असतील त्यांनी अभियानाच्या दिवशी सकाळी ९ वाजता कार्यक्रम स्थळी हजर राहावे डोळे तपासून त्यांना नंबर देता येईल. उपक्रमाच्या दिवशी ३०० ते ४०० रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात येणार आहे. हा उपक्रम डॉ ए. ए. कादरी मानसिक आरोग्य केंद्र, एम. जी. एम. इन्स्टिटयूट ऑफ हेल्थ सायन्सेस, नवी मुंबई, आणि येळीकर्स विद्यासंस्कार फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावानोंदणी साठी आकिब, 7020374074, शाहेद 7972927281, ए. के. एच. हॉस्पिटल 9373409620, डॉ. मेराज कादरी 9923222222 या मोबाईल नंबर वर संपर्क करावा

## छत्रपती संभाजीनगरमध्ये 'कवितेच्या हिंदोळ्यावर' काव्यमैफल व राज्यस्तरीय कविता लेखन स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात संपन्न








**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून 'ध्यास गझल साहित्य समूह' आणि 'टेरेसवरील कविता परिवार' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कवितेच्या हिंदोळ्यावर' हा कविता अभिवाचनाचा दर्जेदार कार्यक्रम आणि राज्यस्तरीय कविता लेखन स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा रविवारी मोठ्या उत्साहात पार पडला. टिळक नगर येथील जीवन विकास ग्रंथालयात आयोजित सोहळ्याने रसिकांची मने जिंकली.कार्यक्रमाचे अध्यक्षपद ज्येष्ठ बालसाहित्यिक मा. प्रा. लीला शिंदे यांनी भूषवले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ कवयित्री मा. रसिका देशमुख, मा. प्रिया धारूरकर (छत्रपती संभाजीनगर) आणि सुप्रसिद्ध कवयित्री व गझलकार मा. अमिता पैठणकर(पुणे ) ज्येष्ठ कवयित्री माधुरी चौधरी यांची उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय कविता लेखन स्पर्धेतील विजेत्यांना गौरवण्यात आले.कवी सचिन वालतुरे यांनी खुमासदार शैलीत सूत्र संचालन केलेकार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेली 'कवितेच्या हिंदोळ्यावर' ही काव्यमैफल शब्दांच्या सुरावटींनी न्हाऊन निघाली होती. यात:अंजली दीक्षित, कल्याणी कोळपकर, कस्तुरी कुलकर्णी, मृणाल देशपांडे, रूपाली पाटील आणि संध्या फुलपागार या कवयित्रींनी जुन्या नव्या कवींच्या कवितांचे भावस्पर्शी अभिवाचन केले.अबोली झोळगीकर यांच्या सुश्राव्य गायनाने कार्यक्रमात अधिक रंगत भरली.काव्य स्पर्धेतील सहभागी व उपस्थित कवी-कवयित्रींचा गौरव या सोहळ्यात राज्यस्तरीय कविता लेखन स्पर्धेत सहभागी झालेल्या आणि आपल्या शब्दांनी रसिकांची मने जिंकणाऱ्या कवी-कवयित्रींची मांदियाळी जमली होती. कार्यक्रमात प्रामुख्याने कवी/ कवयित्रींचा सहभाग व उपस्थिती लक्षणीय होती: सहभागी कवयित्री: तन्वी न्यायाधीश, लता गवळी, सौ. शितल सराफ - थिगळे उपस्थित कवी.कैलास कोळपकर, प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी, सुनील उबाळे, ऋषभ कुलकर्णी, अमेय तांदूळजे, बालेकर सर, रमेश ठोंबरे, संजय न्यायाधीश, हनुमंत सोनवणे,पंडित वराडे, प्रा. विजय पोहनेरकर, सुहास महाजन संजय पवार. कार्यक्रमाचे मुख्य आयोजक गिरीश जोशी यांनी या सर्व कवींचे स्वागत करून त्यांच्या साहित्यातील योगदानाचे कौतुक केले. या सर्वांच्या काव्य सादरीकरणामुळे 'कवितेच्या हिंदोळ्यावर' ही मैफल खऱ्या अर्थाने यशस्वी झाली. या संपूर्ण सोहळ्याचे नेटके नियोजन गिरीश जोशी,मृणाल देशपांडे यांनी केले होते. "कवितेच्या पालखीचे भोई होऊन साहित्याची सेवा करणे हा आमचा मुख्य उद्देश आहे," असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. 'स्वरयज्ञ ऑडिओज' यांनी ध्वनी व्यवस्था सांभाळली. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या रसिक श्रोत्यांच्या प्रतिसादामुळे ही सायंकाळ खऱ्या अर्थाने कवितेचा उत्सव ठरली.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २४ मार्च २०२६

# नागसेन फेस्टिव्हलच्या दशकपूर्तीच्या जल्लोषात भव्य भीमजयंती सोहळा







**छत्रपती संभाजीनगर :** पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या काही मोजक्या आजी-माजी विद्यार्थ्यांनी १२५ व्या भीमजयंतीनिमित्त एकत्र येऊन सुरू केलेला नागसेन फेस्टिव्हल हा महोत्सव यंदा दहाव्या वर्षात पदार्पण करत आहे. दशकपूर्तीच्या निमित्ताने या महोत्सवाचा जल्लोष आणि भीमजयंतीचा दिमाखदार सोहळा दि. २९, ३० व ३१ मार्च रोजी नागसेनवनातील लुम्बिनी उद्यान, मिलिंद महाविद्यालय येथे दररोज सायं. ६ ते १० या वेळेत आयोजित करण्यात आला आहे.दि. २९ मार्च रोजी कन्नड चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते, लेखक व सामाजिक कार्यकर्ते चेतन कुमार (अहिंसा) यांच्या हस्ते या फेस्टिव्हलचे उद्घाटन होणार आहे. दिल्ली येथील ज्येष्ठ पत्रकार उर्मिलेश हे ‘बहुजनांच्या शैक्षणिक नाकेबंदीचे राष्ट्रीय षडयंत्र’ या विषयावर व्याख्यान देणार आहेत. तर ‘मार्मिक’ या व्यंगचित्र मासिकाचे व्यंगचित्रकार गौरव सर्जेराव यांची उपस्थिती असणार आहे.तसेच नितीन गायकवाड प्रस्तुत ‘भीमस्मरण’ हा शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम सादर होणार असून मुरलीधर ताकवाले क्लॅरिनेट या वाद्यावर भीमगीतांचे सादरीकरण करतील.दि. ३० मार्च रोजी ‘आडवी आर्ट (ADAVI Art), बंगलोर’ यांच्या वतीने दक्षिण भारतात, विशेषतः तामिळनाडूमध्ये दलितांच्या सामाजिक समता आणि सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक मानले जाणारे ‘पाराई’ हे वाद्य १२ कलावंतांच्या समूहाद्वारे सादर करण्यात येणार आहे.त्यानंतर डिजिटल मीडिया अर्थात यूट्यूब, वेब पोर्टल, पॉडकास्ट यांच्या माध्यमातून देशातील शैक्षणिक व सामाजिक मुद्द्यांवर भाष्य करणाऱ्या युवा पत्रकारांचा ‘नव माध्यमातील आंबेडकरी पत्रकारितेचे वर्तमान आणि भविष्य’ या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. या परिसंवादात सुमित चौहान (दिल्ली), साहिल वाल्मिकी (नोएडा), हितेश कुमार (दिल्ली), राज असरोडकर (उल्हासनगर), राहुल डोंगरे (नागपूर) आणि मनीष सागर (मनाली) सहभागी होणार आहेत.त्यानंतर ‘एल्गार समतेचा’ हे कवी संमेलन पार पडणार आहे. यासाठी विशेष अतिथी म्हणून ‘कौन जात हो भाई’ या प्रसिद्ध कवितेचे रचनाकार युवा कवी बच्चालाल उन्मेष (बनारस), डॉ. अनिकेत खांडकर (मुंबई), गिरीश खोब्रागडे (यवतमाळ) आणि रमेश बुरबुरे (गडचिरोली) उपस्थित राहणार आहेत.फेस्टिव्हलच्या समारोप प्रसंगी दि. ३१ रोजी रॅमन मॅगसेसे पुरस्कार प्राप्त सफाई कर्मचारी आंदोलनाचे राष्ट्रीय संयोजक बेजवाडा विल्सन हे ‘तंत्रज्ञानाचा बुरखा, मॅन्युअल स्कॅव्हेंजिंगचा चेहरा : भारताचं जात वास्तव’ या विषयावर भाष्य करतील. या सत्राचे अध्यक्ष म्हणून सिने अभिनेते व लेखक मिलिंद शिंदे हे असणार आहेत.त्यानंतर ‘जल्लोष भीमजयंतीचा’ या विशेष सत्रात प्रांजल सुरडकर, रिदम रिव्होल्यूशन संघाचा फ्लॅश मॉब, विपीन तातड आणि टीम यांचे रॅप सादरीकरण होईल. तसेच VIP श्रावस्ती आणि हरीश कांबळे हे देखील रॅप सादर करतील. तर लिटिल स्टार अरहं वाळके हा बाल कलाकार भीमगित सादर करणार आहे. स्वाक्षरी मोहीमफेस्टिव्हलच्या तिन्ही दिवसांत महाबोधी बुद्धविहार मुक्ती आंदोलनाच्या समर्थनार्थ तसेच शैक्षणिक क्षेत्रातील भेदभावाच्या विरोधात ‘रोहित ॲक्ट’च्या धर्तीवर कडक कायदा करावा, तसेच अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाची शिफारस करणारा बदर समितीचा अहवाल फेटाळून उपवर्गीकरण रद्द करावे, या मागण्यांसाठी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येणार आहे. संकलित स्वाक्षऱ्यांचे निवेदन शासनाकडे पाठविण्यात येणार आहे.व्यंगचित्र प्रदर्शननागसेन फेस्टिव्हल अंतर्गत मिलिंद नागसेनवन स्टुडंट्स वेल्फेअर असोसिएशन आणि ‘कंबाईन कार्टूनिस्ट’ या व्यंगचित्रकार संस्थेच्या संयुक्त विद्यमाने लोकशाही, संविधान, शैक्षणिक क्षेत्रातील भेदभाव, हुकूमशाही अशा विविध विषयांवर परखड व मिश्किल भाष्य करणारे महाराष्ट्रातील नामवंत व्यंगचित्रकारांच्या व्यंगचित्रांचे प्रदर्शन तिन्ही दिवस आयोजित करण्यात येणार आहे.शहरातील निवडक दहा बौद्ध विहार समित्यांचा ‘कृतिशील बौद्ध विहार’ म्हणून विशेष सत्कार करण्यात येणार आहे.जिल्हा वकील संघातून बहुमताने विजयी ठरलेल्या डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात येणार आहे.दर रविवारी शहरातील अनेक बुद्ध विहारांमध्ये मोफत वैद्यकीय सेवा पुरविणाऱ्या दामा हेल्थकेअर फाऊंडेशनच्या सर्व सदस्यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. अनेक कलांचा संगम । कलावंतांसाठी पर्वणीबौद्धिक उपक्रमांसाठी प्रभावी ठरत असलेला नागसेन फेस्टिव्हलचा मंच आता कलावंतांसाठीही हक्काचा मंच म्हणून समृद्ध होत आहे. यंदा ‘नागसेन कला दालन’ उभारून त्यामध्ये व्यंगचित्र प्रदर्शन, लाईव्ह पेंटिंग डेमोस्ट्रेशन, लाईव्ह मूर्तिकला डेमोस्ट्रेशन, स्टोन आर्ट अशा विविध कलाप्रकारांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. यासाठी कलावंतांना आपली कला सादर करण्याची विशेष संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.नागसेन चषक क्रिकेट स्पर्धाया अंतर्गत नागसेनवनातील विविध महाविद्यालयांच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये मैत्रीपूर्ण क्रिकेट सामने होणार असून या स्पर्धेमुळे कर्मचारी वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या सामन्यांमुळे परस्पर संवाद व स्नेह दृढ होणार असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.तसेच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेताना सादर केलेले युगयात्रा हे महानाट्य 70 वर्षांनंतर पुन्हा सादर करणाऱ्या मिलिंद कला महाविद्यालयाच्या ‘युगयात्रा’ या महानाट्याशी संबंधित सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सिने अभिनेते मिलिंद शिंदे यांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे.मिलिंद सन्मान पुरस्काराची घोषणासमाजाप्रती आपली जबाबदारी ओळखून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना नागसेन फेस्टिव्हल समितीच्या वतीने देण्यात येणारा ‘मिलिंद सन्मान पुरस्कार’ यंदा जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये हर्सूल कारागृह येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन डोंगरे, विधी क्षेत्रातून ॲड. अभय भोसले, वैद्यकीय क्षेत्रातून डॉ. मनोज भुक्तार व डॉ. महेंद्र गायकवाड, संशोधन क्षेत्रातून अभिजित वाघरे, शैक्षणिक उपक्रमांतर्गत ‘बिन छताची शाळा’ या उपक्रमाचे भगवान सदावर्ते, कला क्षेत्रातून नंदकुमार जोगदंड तसेच लेणी संवर्धन व धम्म कार्यासाठी सूरज जगताप, क्रीडा संघटक म्हणून सुदंर घाटे यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.मतदान प्रक्रियेत प्रामाणिकपणा आणि लोकशाही मूल्यांचे जतन करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर डॉ.आंबेडकर नगर येथील युवकांनी राबविलेल्या एका अभिनव उपक्रमाचा विशेष गौरव यात करण्यात येणार आहे.या दशकपूर्ती वर्षानिमित्त आयोजित सर्व उपक्रमांना मोठ्या संख्येने आजी-माजी विद्यार्थी, नागरिक व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सचिन निकम, हेमंत मोरे, ॲड.सुनील मगरे, प्रा.मिलिंद मनवर, मेघानंद जाधव, के.एम बनकर, प्रा प्रबोधन बनसोडे, अविनाश कांबळे, राष्ट्रपाल गवई, कुणाल भालेराव, रत्नदीप रगडे, सिद्धार्थ दिवेकर आदींनी केले आहे

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103